**SANSKRUTI INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**

***Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj***

………………..…………………..……………………………………………….

# भारतीय परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादाचे तत्व

**प्रमोद सुकुमार कराडे**

राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, ता. कराड, जि. सातारा.
मो. ९०११७६७३८३

**प्रास्ताविक :—**

आंतरराष्ट्रीय पातळीवर आजच्या काळात कोणतेही एक राष्ट्र आपल्या गरजा पुर्ण करून ते स्वयंपुर्ण होवु शकत नाही. त्या राष्ट्राला इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करावेच लागतात. हे संबंध प्रस्थापित करित असताना संबंधित राष्ट्राने निश्चित केलेल्या तत्वांना व धोरणांना त्या राष्ट्राचे 'परराष्ट्र धोरण' असे म्हणतात. राष्ट्रीय हितसंबंध हा घटक प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा प्रमुख आधार असतो. तर भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांबरोबर नैसर्गिक साधनसंपत्ती, आर्थिक विकास, विचारप्रणाली आणि नेत्तृत्व यासारखे विविध घटक परराष्ट्र धोरण ठरविताना निर्धारिक ठरतात. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादाचे तत्व या गोष्टीचे अध्ययन करण्याच्या हेतूने प्रस्तूत शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**भारतीय परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी :—**

जागतिक पातळीवर आज प्रत्येक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण ठरवावे लागते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र झाला. तत्पूर्वी भारतावर ब्रिटीशांचे राज्य असल्याने भारताच्या परराष्ट्र धोरणासंबंधीचे निर्णय इंग्लंडमध्ये घेतले गेले. स्वातंत्र्यानंतर ते आजपर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारण विविध टप्प्यांत झाल्याचे आपणांस दिसते. स्वातंत्र्यापासून ते सद्यकाळापर्यत पाहिले तर भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादाचे धोरण पुढे चालूच ठेवले आहे.

**भारताचे परराष्ट्र धोरण :—**

**१) पंडीत नेहरू आणि भारताचे परराष्ट्र धोरण**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण ठरविण्यामध्ये पंडीत नेहरूंची भूमिका महत्वाची आहे. पंडीत नेहरूंचे परराष्ट्र धोरणविषयक विचार मुळातच भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये घडले होते. त्यांच्या मते, 'सधन किंवा विकसित राष्ट्रांचा गट हा विकसनशिल

राष्ट्रांच्या विरोधी भूमिका घेतो. म्हणून विकसित राष्ट्रांपासून अलिप्त राहण्याचे धोरण योग्य आहे' तर दुसऱ्या बाजुस साम्यवादी विचारांचा दुसरा गट हा भांडवलशाही विरोधी आहे. त्यामूळे हे दोन्ही गट आपल्या परराष्ट्र धोरणाचा विस्तार करण्यासाठी स्वताच्या गटात सामिल करूण घेण्याच्या प्रयत्नात असतात. यामुळे त्यांच्यापासून अलिप्त राहून राष्ट्राची बांधणी करण्याचे प्रारूप नेहरूंनी मांडले. हा अलिप्ततावादाचा विचार नेहरूंनी सप्टेबर १९४६ मध्ये मांडला. अलिप्ततावादाची काही वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

अ) लष्करी संघटना व लष्करी करारापासून अलिप्त.

ब) शांततेच्या धोरणाचा अवलंब.

क) स्वातंत्र व सार्वभौमत्व यांचा अंगिकार.

ड) निर्भयतेचे धोरण.

इ) प्रसंगानूरूप कारवाई करण्याचे स्वातंत्र.

श्या अलिप्ततावादी विचारावरून असे दिसते की, नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे इतर राष्ट्रांच्या अंतर्गत प्रश्नांत हस्तक्षेप न करता राष्ट्रीय हित जोपासणारे होते. असे असले तरीही १९६२ रोजी भारत—चीन यांच्यात युद्ध झाले आणि त्यामध्ये चीनकडून भारतास पराभव पत्करावा लागला.

**२) लाल बहादूर शास्त्री आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

भारताच्या परराष्ट्र धोरणात लाल बहादूर शास्त्रींची ओळख एक खंबीर नेतृत्व अशी होती. त्यांच्या कारकिर्दीत १९६५ रोजी भारत — पाकिस्तान युद्ध झाले. अखेरिस सोव्हीएत युनियनमधील ताश्कंद येथे त्यांच्या पुढाकाराने ते भारताचे पंतप्रधान म्हणून व पाकिस्तानचे अध्यक्ष आयुब खान यांच्यात ताश्कंद करार झाला. मात्र कराराच्या दुस—याच दिवशी लाल बहादूर शास्त्रींचा मृत्यू झाला.

**३) श्रीमती इंदिरा गांधी आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

भारताच्या पंतप्रधानपदी श्रीमती इंदिरा गांधी १९६६ ते १९७७ पर्यत राहिल्या. इंदिरा गांधीच्या नेतृत्वाची कसोटी बांग्लादेश निर्मितीवेळी दिसून आली. पाकिस्थानी राज्यकर्त्यानी बांग्लादेशातील निरपराध जनेतवर चालविलेल्या अनन्वित अत्याचारामूळे बांग्लादेशातून निर्वासितांचा लोंढा भारतात वाहू लागला होता. या निर्वासितांच्या प्रश्नांची दखल आंतरराष्ट्रीय समुदायाने घ्यावी अशी मागणी त्यावेळी भारताने केली. त्यातून पुढे १९७१ साली भारत व पाक यांच्यात तिसरे युद्ध झाले. त्यात भारतीय सैन्याने निर्णायक विजय मिळविला. याचा परिणाम म्हणजे पाकिस्थानमध्ये सत्तांतर घडून आले. झुल्फिकार अली भुट्टो हे पाकिस्थानचे नवे

पंतप्रधान बनले. त्यांना चर्चेतून प्रश्न सोडवणे गरजेचे वाटल्याने इंदिरा गांधी व झुल्फिकार अली भुट्टो यांच्यात १९७२ रोजी 'सिमला करार' झाला.

इंदिरा गांधींच्या काळात परराष्ट्र धोरणात दुसरी महत्वाची गोष्ट घडली ती म्हणजे भारत व सोविएत युनियन मैत्री करार होय. १९७१ साली सोविएत युनियनबरोबर भारताने वीस वर्षाचा मैत्री, शांतता व सहकार्याचा करार केला. पुढे सोविएत युनियनने भारताच्या अलिप्ततावादी धोरणास पाठिंबा दिला. अशाप्रकारच्या सर्व गोष्टी बरोबरच इंदिरा गांधींनी आपल्या परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हितसंबंधाना प्राधान्य दिले होते.

**४) जनता पक्षाची राजवट आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

१९७७ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकात जनता पक्षास बहुमत मिळाले. १९७७ ते १९८० पर्यंतच्या काळात जनता पक्षाचे सरकार मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली अधिकारावर राहिले. या काळात परराष्ट्र खात्याची जबाबदारी श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्यावर सोपविली होती. तत्कालीन परिस्थीतीत अटलबिहारी वाजपेयींनी भारतीय परराष्ट्र धोरणात काही मुलगामी बदल न करता अलिप्ततावादी धोरणाचाच पाठपुरावा केला. कारण अटलबिहारी वाजपेयींना असे समजून आले होते की, आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिस्थीतीत सोव्हिएत युनियनशी असलेल्या संबंधात दुरावा उत्पन्न होणे भारताला परवडणारे नव्हते. पुढे अंतर्गत मतभेदामुळे देसाईंचे सरकार कोसळले.

**५) इंदिरा गांधींचे पुनरागमन आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

१९८० मध्ये भारतात मुदतपुर्व निवडणूका घेण्यात आल्या होत्या. त्या निवडणूकीत इंदिरा गांधी पून्हा बहुमत मिळवून पंतप्रधान झाल्या. त्यांनी पुर्वीचेच धोरण पुढे चालू ठेवले. परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत अलिप्ततावादाचा त्याग करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे त्यांनी घोषित केले. अलिप्ततावादी राष्ट्रांची सातवी शिखर परिषद १९८३ मध्ये नवी दिल्ली येथे भरली होती. या शिखर परिषदेमध्ये ९९ राष्ट्रांनी भाग घेतला होता. या शिखर परिषदेच्या अध्यक्षस्थानी इंदिरा गांधी होत्या. त्यांनी या शिखर परिषदेत निशस्त्रीकरण, अण्वस्त्र प्रसारबंदी व अण्वस्त्र चाचणी बंदीबरोबरच जगात शांतता प्रस्थापित करणे व आंतरराष्ट्रीय सद्‌भाव वृध्दि्गत करण्यासाठी प्रयत्नशिल राहण्याचेही उद्देश ठरविले. अशा प्रकारचे इंदिरा गांधींचे परराष्ट्र धोरण राहिल्याचे दिसते.

**६) राजीव गांधी आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर १९८४ ते १९८९ या कालावधीत भारताच्या पंतप्रधानपदी राजीव गांधींची निवड झाली. त्यांनी प्रथम अलिप्ततावादी धोरण पुढे चालू ठेवण्याचे घोषित

केले. १९८६ साली भरलेल्या अलिप्ततावादी राष्ट्रांच्या आठव्या शिखर परिषदेस ते उपस्थित होते. या परिषदेत राजीव गांधींच्या पुढाकाराने 'आफ्रिकी एकता निधी' उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्या निधीचा उद्देश आफ्रिका खंडातील चालू असलेल्या वर्णविरोधी लढयाला मदत करणे हा होता.

तत्पूर्वी १९६२ च्या भारत—चीन युध्दामूळे आशिया खंडातील राजकीय परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम झाला होता. पण भारत—चीन यांच्यात फार काळ दुरावा राहणे हे दोन्ही देशांच्या दृष्टीने हितकारक नव्हते. त्यामुळे राजीव गांधींनी पुढाकार घेवून १९८८ साली चीनला भेट देवून दोन्ही देशांच्या दरम्यान असलेल्या सीमाप्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी संयुक्त कृती समितीची स्थापणा करण्याचा निर्णय घेतला. तसेच दोन्ही देशांनी आर्थिक, सामाजिक क्षेत्रात परस्पर सहकार्यासाठी एकत्र येण्याचे मान्य केले. त्यामुळे दोन्ही देशांत परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

**७) व्ही. पी. सिंग आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

भारतामध्ये १९८९ नंतर सत्तांतर होवून व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे सरकार स्थापन झाले. व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला निर्णय आणि देशातील राजकीय अस्थिरता या प्रमुख दोन कारणांमुळे देशाच्या परराष्ट्र धोरणात कोणत्याही प्रकारचा महत्वाचा बदल न करता अलिप्ततावादी धोरणच पुढे चालू ठेवले गेले.

**८) पी. व्ही. नरसिंहराव आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

१९९१ साली पी. व्ही. नरसिंहराव यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची सुत्रे हाती घेतली. त्यावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर सोव्हीएत युनियनचे विघटन झाले होते. पुर्व यूरोपातील राष्ट्रांनी साम्यवादाचा त्याग केला होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील साम्यवादी गट संपुष्टात येवून अमेरिका हा देश एकमेव जागतिक महासत्ता म्हणून ओळखला जावू लागला होता. मात्र भारताने आपल्या अलिप्ततावादी धोरणाचा त्याग केला नाही. नरसिंहरावाच्या काळात अलिप्ततावादी राष्ट्रांच्या दोन शिखर परिषदा भरल्या होत्या. त्यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेवून महत्वाच्या प्रश्नांवर एकमत घडवून आणण्याची भूमिका योग्य प्रकारे बजावली.

नरसिंहराव यांनी जरी अलिप्ततावादी धोरणाशी बांधिलकी ठेवली असली तरी अमेरीकेशी आर्थिक सहकार्य व जवळीक वाढविली. पुढे भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारले. हा महत्वपूर्ण बदल भारताच्या परराष्ट्र धोरणात घडून आल्याचे दिसते. पंडीत नेहरूंनी इजिप्तशी जवळचे संबंध ठेवून अलिप्ततावादी चळवळ मजबूत केली होती. त्या चळवळीसंबंधी

नरसिंहराव यांच्या काळात भारत सरकारच्या धोरणात बदल होवून इस्त्रायलशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याची गरज भारतीय नेतृत्वास वाटू लागली.

**९) संयुक्त आघाडी सरकार आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

१९९६ च्या सार्वत्रिक निवडणूकांत कोणत्याही एका राजकीय पक्षास निर्विवाद बहुमत न मिळाल्याने आघाडी सरकारचा प्रयोग करण्याची वेळ पुन्हा एकदा आली. १९९६ ते १९९८ हा संयुक्त आघाडी सरकारचा दोन वर्षाचा कालखंड राजकीय अस्थिरतेचा म्हणता येईल. त्यामुळे पुर्वीचेच परराष्ट्र धोरण म्हणजे अलिप्ततावादी धोरणच पुढे चालू राहीले. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल घडून आला नाही.

**१०) राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

संयुक्त आघाडी सरकार १९९८ मध्ये कोसळल्याने लोकसभेच्या मध्यावधी निवडणूका घेणे भाग पडले. १९९८ च्या लोकसभा निवडणूकीत कोणत्याही एका पक्षास स्पष्ट बहुमत न मिळाल्याने आघाडी सरकारचा प्रयोग झाला. पुढे १९९९ च्या लोकसभा निवडणूकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीस सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली. त्यांनी पाच वर्षे कालावधी पुर्ण केला. या पाच वर्षाच्या कालावधीत अलिप्ततावादी धोरण पुढे चालू ठेवले. कारण सोव्हीएत युनियनच्या विघटनानंतरही जागतिक अलिप्ततावादी चळवळीकडे आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक प्रभावी शक्ती म्हणून पाहीले जात होते.

भारताच्या परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय लोकशाही आघाडीस सरकारने आपल्या सामर्थ्यात वाढ करण्याच्या हेतुने अण्वस्त्र धोरणाबाबत फेरविचार करून अण्वस्त्र चाचणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १९९८ मध्ये राजस्थानमधील पोखरणच्या वाळवंटात पाच अणुचाचण्या यशस्वीरित्या घेतल्या. मात्र याचा वापर भारत शांततेसाठी करेल असे त्यांनी स्पष्ट केले. राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहराव, एच. डी. देवेगौडा व इंद्रकुमार गुजराल यांच्या कारकिर्दित भारत—चीन सहकार्य वृध्दिंगत करण्याची प्रक्रिया घडत होती. मात्र राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या काळात चीनशी दुरावा उत्पन्न झाल्याचे दिसते. तर अरब राष्ट्रांच्या बाबतीतही पुर्वीपासून असलेले विविध क्षेत्राांतील संबंध वृध्दींगत करण्यास उत्सुकता दाखविली गेली नसल्याचे दिसते.

**११) डॉ. मनमोहन सिंग आणि भारताचे परराष्ट्र धोरण.**

२००४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार सत्तेवर आले. डॉ. मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड झाली. त्यांनीही पुर्वीपासून स्विकारलेल्या अलिप्ततावादी धोरणावर विश्वास ठेवला. तसेच जागतिक अलिप्ततावादी चळवळीशी असलेली बांधिलकी मनमोहन सिंगानी घोषित केली. या सरकारने आर्थिक क्षेत्रात

उदारीकरणाच्या धोरणाचा स्विकार केला असल्याने त्यास अमेरीकेबरोबर मैत्रीपुर्ण संबंध स्थापन करणे आणि ते संबंध आधिक घनिष्ठ करणे आवश्यक वाटले. त्यानुसार भारतµअमेरिका यांच्यात अणुसहकार्याचा करार झाला. तसेच विकसनशिल राष्ट्रांचा सहकार्याच्या प्रश्नांकडे डॉ. मनमोहन सिंग यांनी काही प्रमाणात दुर्लक्ष केले. जागतिक अलिप्ततावादी चळवळीचा संस्थापक सदस्य या नात्याने भारताने सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर विकसनशिल राष्ट्रांतील सहकार्य वृध्दींगत करण्यासाठी ही चळवळ चालू ठेवून तिला बळकटी प्राप्त करून देण्याची गरज होती. मात्र भारत सरकार याबाबतीत काहीही करू शकले नाही.

**सारांश :**

पंडीत नेहरू यांनी भारताच्या अलिप्ततावादी धोरणावर भाष्य करताना असे म्हटले होते की, अलिप्ततावाद याचा अर्थ आंतरराष्ट्रीय राजकारणापासून अलिप्त राहणे नव्हे. उलट भारताला जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत विधायक भूमिका पार पाडावयाची आहे. ही भूमिका सक्षमतेने पार पाडता यावी म्हणून आम्ही अलिप्ततावादाचा स्विकार केला आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत विधायक भूमिका पार पाडण्यासंबंधीच्या नेहरूंच्या धोरणाचा डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारला विसर पडला आहे असे वाटण्याइतपत या सरकारच्या धोरणात एकारलेपण आले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्वाच्या प्रश्नांवर स्पष्ट व सडेतोड भूमिका घेण्याची त्यांची तयारी नाही. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेला दुखावण्याचे धाडस हे सरकार करू इच्छित नाही. तेव्हा जागतिक अलिप्ततावादी चळवळीशी आपली बांधिलकी असल्याचे डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने स्पष्ट केले असले तरी ही बांधिलकी कितपत प्रामाणिक आहे असा प्रश्न कोणालाही पडेल.

**संदर्भग्रंथ**

१) डॉ. देवळाणकर शैलेंद्र, भारताचे परराष्ट्र धोरण.

२) डॉ. रासम वासंती, डॉ. खापरे के. एस., आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण.

३) डॉ. पवार एस. डी., भारत अमेरिका अणूकरार.

४) Arora Prem., Foreign Policy.